ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१ !



jpp51_51@jnanaprabodhini.org

गोष्ट क्र. ९

२८ फेब्रुवारी २०२१

## *प्रदीप परांजपे*

*(१९७३ - ७९)*



एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की लोक कायम तुमच्याकडे पाहत असतात आणि तुमच्याकडे पाहून शिकत असतात. तुम्ही प्रत्यक्ष सांगितले नाही तरी तुमच्या भावना समोरच्याला कळत असल्याने आघाडीवर राहून नेतृत्व करणे हे महत्त्वाचे असते. तुम्ही नेता म्हणून जे बोलता ते करून दाखवायला हवे! मी एक काहीतरी सांगतो आहे आणि काम दुसरेच करतो आहे असे झाले तर लोक ते समजू शकत नाहीत.

'कुतूहल' हा शब्द ज्ञान प्रबोधिनीने दिला. कुठलेही काम करण्याची लाज वाटता कामा नये हे आम्ही प्रबोधिनीमध्ये शिकलो. विचार करताना मला वाटते ज्ञान प्रबोधिनीची सर्वात मोठी देणगी कुठली असेल तर the way we can connect to people is amazing !

**प्रशालेतील आठवणी**




चौथीमध्ये असताना एके दिवशी अचानक वडिलांनी मला कुठलीही तयारी नसताना एका परीक्षेला बसवलं आणि नू.म.वि. मधून ज्ञान प्रबोधिनीमध्ये घातलं. त्या वयामध्ये एक अशी रुखरुख होती की आता आपले चौथीपर्यंतचे मित्र पुन्हा भेटणार नाहीत. त्यावेळी मला प्रबोधिनीमध्ये आल्याचे असे काही विशेष वाटत नव्हते. खरेतर आमचा नू.म.वि.मध्ये १२-१५ मित्रांचा गट होता त्यांची आठवण यायची. प्रबोधिनीत आल्यावर देखील आमच्या वर्गात फक्त २८ मुले होती. त्यामुळे सर्वांना माहिती असेल ते प्रबोधिनीचे वैशिष्ट्य म्हणजे आम्हाला सर्व २८ जणांची पूर्ण नावे तोंडपाठ असायची. फक्त पाचवी मधल्या मुलांचीच नाही तर ५वी ते ११वी सर्व मुलांची नावे आम्हाला पाठ होती. मी पाचवीमध्ये असताना धनंजय केळकर ९वीमध्ये होते आणि आमचे पथक प्रमुख होते. मोहनराव आमचे मार्गदर्शक होते आणि ते आमचा अभ्यास घ्यायचा प्रयत्न करायचे. आम्ही त्यांना घेऊ द्यायचो नाही ही वेगळी गोष्ट ! प्रबोधिनीमधील सगळी वर्षं अशी मजेत गेली.

नंतर असे जाणवले की we are pampered. आम्हाला भरपूर सोयी-सुविधा आणि ज्या काही गोष्टी त्या काळात मिळाल्या त्या बाकीच्या शाळेत कुठे दिसत नाहीत. बुद्धिवंत मुले निवडून त्यावर संस्कार करायची आप्पांची जी कल्पना होती त्या दृष्टीने प्रत्येक विद्यार्थ्यामागे किमान ८ ते १० जण काम करत असायचे असे मला आत्ता जाणवत आहे. आमच्यासाठी मोहनराव, अजितराव, भाई फडके, विकु (विवेक कुलकर्णी) अशी सगळी मंडळी इतक्या जवळची असल्याने ते आमच्यावर संस्कार वगैरे करत आहेत असे कधी त्यावेळी जाणवले नाही. आमच्यासाठी प्रबोधिनीमध्ये एकामागोमाग एक असे भरपूर उपक्रम होत असत आणि आम्ही सर्वच विद्यार्थी त्यात आवडीने सहभाग घेत असू. राखीविक्री संपली की गणपती, गणपती संपले की लगेच शिबिर असे उपक्रम सुरूच असायचे. पण ह्या सलग उपक्रमांचा कधी ताण जाणवला नाही. आधी यशवंतराव होते मग वामनराव होते. वामनरावांचे वैशिष्ट्य असे होते, की ते संस्कृत आणि गणित असे दोन विषय शिकवायचे. दोन्हीमधले ते मास्टर होते. असे प्रत्येक मुलावर जातीने तासन् तास कष्ट घेणारे अनेकजण त्यावेळी आमच्या पाठीशी होते. आज पुन्हा मागे वळून पाहताना मला त्याबद्दल खूप आनंद वाटतोय!

सांगता येण्यासारख्या प्रत्येक व्यक्तीच्या अनेक आठवणी आहेत. त्यावेळी आत्ताच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या जागी संचालक कार्यालय होते. आप्पांच्या त्या कार्यालयाला एक काच लावलेली होती. सातवी-आठवीमध्ये मी असेन तेव्हाचा कधीतरी घडलेला हा प्रसंग. मी शाळा सुटली की त्या काचेवर एक नाणं घेऊन तिथे घर्रर्रर्रर करत जात असे. एक दिवस बरोबर मला आप्पांनीच पकडले. म्हणाले, या इकडे म्हणून कार्यालयात नेले. मला वाटले आता जाम ओरडा बसणार पण आप्पा म्हणाले, अहो प्रदीप तुमच्या ही गोष्ट लक्षात नाही आली की नेहमी सात वाजताच हा आवाज करत जात असल्याने मला तुम्हाला पकडणे सोपे गेले. विचार करण्याची गोष्ट अशी की त्यांनी ह्या प्रसंगाकडे कसे पाहिले. आता असे घडल्यावर मी पुन्हा आयुष्यात असे करेन का सांगा? हा **आप्पांकडून नकळत झालेला संस्कार होता. त्यांच्या इतरही अनेक गोष्टी सांगता येतील आणि त्यांच्याबद्दल बोलावे तेव्हढे थोडेच आहे. एखादा मनुष्य वर्षानुवर्षे इतका उत्साही आणि इतका कार्यशील कसा असू शकतो याचे आश्चर्य वाटायचे. मी पाहिलेली पहिली व्यक्ती म्हणजे आप्पा** ! त्यानंतरही अशी माणसे फार कमी पाहायला मिळाली. एक शंतनुराव किर्लोस्कर पाहिले, आत्ताच्या काळात आपण नरेंद्र मोदी पाहत आहोत. दिवसरात्र, वर्षानुवर्षे कार्यरत राहणे आणि सतत चालत राहणे हे या माणसांना सहज शक्य झाले. ज्यांच्याबद्दल बोलता येईल अशी अनेक लोकं मला प्रबोधिनीत भेटली. मी अविदांच्या खूप जवळचा होतो आणि अगदी द्वितीय-तृतीय वर्षापर्यंत, पंजाब दौऱ्यापर्यंत आमची जवळीक होती. ह्या सगळ्या लोकांमध्ये प्रचंड उत्साह आणि कार्यशक्ती होती. विकु बद्दल सांगायचं तर मी इंजीनीअरींग का घेतले तर विकु इंजीनीअर होता. मी इलेक्ट्रिकल का निवडले तर विकुचे इलेक्ट्रिकल होते. असे सगळे माझ्या नकळत घडत गेले. माझा स्वत:चा असा काही विचार नव्हता पण विकु करतोय म्हणजे नक्की काहीतरी चांगलं असणार असा ठाम विश्वास होता. भाई असाच अफाट उत्साही होता. काहीतरी करायचं म्हणून ही लोकं काम करत नव्हती तर तो त्यांचा नैसर्गिक स्वभाव होता. आम्हाला प्रबोधिनीचा सर्वात जास्त फायदा काय झाला असेल तर आम्ही विचार करायला शिकलो आणि मोठा विचार करायला शिकलो. फक्त आपल्यापुरता नव्हे तर किमान देशाचा विचार केला पाहिजे. त्यावेळी आप्पांचे वाक्य होते, की २०० कार्यकर्ते आपल्याला देशाला द्यायचे आहेत. त्या २०० कार्यकर्त्यांसाठी वेगवेगळ्या गोष्टी करून पाहायचे. **प्रशालेने आम्हाला प्रचंड आत्मविश्वास दिला. एखादी गोष्ट जी दुसरा करू शकतो ती मी करू शकत नाही, असे आजवरच्या ५० वर्षांच्या अनुभवात मला कुठेही वाटले नाही. या आत्मविश्वासाचे श्रेय ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षणपद्धतीचे आहे.**

## दले आणि पथकश: रचना

**त्यावेळी अंतर्गत पथकश: रचना असायची आणि रामदास, दयानंद, विवेकानंद आणि अरविंद अशी चार पथके होती. त्यावेळी चांगला प्रयोग झाला तो म्हणजे प्रशालेव्यतिरिक्त बाहेरची दले सुरू झाली. त्यानिमित्ताने समाजाशी कनेक्ट निर्माण झाला. प्रशालेनंतर मी प्रशाले बाहेर सुरू असणाऱ्या दलांवर जायचो. त्यावेळी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर अजितराव कानिटकर परशुराम दल आणि सहकार नगरमध्ये अविनाश धर्माधिकारी शिवाजी दल अशा दोन ठिकाणी दले चालवायचे. जसा मला ज्ञान प्रबोधिनी, पुणे प्रशालेपेक्षा निगडी प्रशालेचा प्रयोग जास्त सरस वाटतो तसा मला पथकांपेक्षा बाहेरच्या दलांचा प्रयोग जास्त सरस आणि जवळचा वाटला. तेव्हा माझ्या विचारांच्या कक्षा रुंदावल्या. आजही चांगली तत्त्व आणि चांगल्या गोष्टी टिकवणारे लोक कमी होताना दिसत आहेत. अशावेळी आपण प्रबोधिनी म्हणून जास्तीस्त जास्त वाढायला पाहिजे असे मला वाटते. प्रशालेत आपण जे शिकतो ते कोणासाठी, तर सर्वांसाठी, समाजासाठी काहीतरी चांगलं करण्यासाठी हे त्यावेळी उमगले! बाहेरच्या जगाशी जी ओळख व्हावी लागते ती ओळख व्हायला माझी सुरुवात या दलांमुळे झाली.**



स्पष्ट सांगायचे तर मी आयुष्यात काय करायचे किंवा करिअर काय निवडावे हा विचार शालेय किंवा महाविद्यालयीन जीवनात माझा कधीच ठरला नव्हता. १२वी पर्यंत मी प्रशालेतच होतो आणि साधारण १९८४ सालापर्यंत मी रोज दलावर येणारा मुलगा होतो. काही वेळेला आम्ही इंजीनीअरींगचा गट मिळून बॅडमिंटन, क्रिकेट, फुटबॉल खेळायला जात असू. १९८४ सालच्या पंजाब दौऱ्याला मी गेलो होतो आणि तोपर्यंत प्रबोधिनीच्या चांगल्या संपर्कात होतो. पंजाब दौऱ्यात माझ्यावर असे काम होते, की सगळ्या राजकीय नेत्यांना दिल्लीमध्ये भेटायचे, त्यांच्या मुलाखती घ्यायच्या आणि त्यांना आपल्या दौऱ्याची माहिती द्यायची. मी त्यावेळी द्वितीय वर्षात शिकत होतो आणि अशा वयात चरणसिंगांच्या घरी जाऊन त्यांची वेळ घेऊन मुलाखत घेतली. मला इंजींनीअरींग कॉलेज आणि ज्ञान प्रबोधिनी वेगळे जाणवलेच नाही. अभ्यासात कधी मी पहिल्या क्रमांकात नव्हतो आणि कधी असे वाटले देखील नाही की पहिलेच आले पाहिजे. एक नक्की होते की शेवटच्या वर्षी आपल्याला डिस्टींक्शन मिळाले पाहिजे आणि मग त्यासाठी प्रयत्न करून डिस्टींक्शन मिळवले. इंजींनीअरींग होईपर्यंत माझी स्वप्न अशी काही ठरलेली नव्हती. मला बऱ्याच वेळेला आश्चर्य वाटते की लोकं आठवी – दहावीमध्ये असताना त्यांना काय आवडते ते ठरवू शकतात. माझे तसे नव्हते आणि मी गमतीने म्हणतो की आजही वयाच्या ५६व्या वर्षी मला संपूर्णपणे माहीत नाही की मला नक्की काय मिळवायचे आहे. विनोदाचा भाग सोडला तर माझ्या मनात असे काही त्यावेळी नव्हते की मी तंत्रज्ञानात उत्तुंग असे काही करेन.

## किर्लोस्कर मधील सुरुवात

गंमतशीर गोष्ट अशी की माझी किर्लोस्कर ऑइल इंजीनस्मध्ये ट्रेनी म्हणून निवड झाली, **त्याचा पहिला दिवस मी अजूनही विसरणार नाही. माझ्या पहिल्याच दिवशी मला असं लक्षात आलं, की आपण जे चार वर्षांत इंजींनीअरींगमध्ये शिकलो आहोत त्याचा इथे काहीच उपयोग नाही.** आपण आत्तापर्यंत जे शिकलो आहोत आणि कंपनीमध्ये जे सुरू आहे ह्याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही हे लक्षात आल्यावर मी संपलोच होतो. पण ज्ञान प्रबोधीनीची शिकवण होती की अशक्य काहीही नाही आणि कुठलेही काम छोटे नाही. मला आठवतयं मी ट्रेनी इंजीनीअर म्हणून अगदी इलेक्ट्रिशियन बरोबर पॅनल घेऊन जाताना नेहमी लोक मला पहायचे. त्यावेळी मला त्यात विशेष असे काही वाटले नव्हते. मात्र लोकांना विशेष वाटायचे की हा इंजीनीअर असून यांच्यासोबत काम कसा करतोय? या सगळ्या काळात माझे खूप शिक्षण झाले आणि मुख्य म्हणजे मी हाताने काम करायला शिकलो. **आजसुद्धा कितीही मोठ्या इलेक्ट्रिकल पॅनल मधली कुठलीही अडचण सोडवू शकतो याचे श्रेय किर्लोस्कर ऑइलचे आहे. त्याचे मूळ मला ज्ञान प्रबोधिनीतील 'करून पहा' म्हणण्यात सापडते. 'कुतुहल' हा शब्द ज्ञान प्रबोधिनीने दिला. कुठलेही काम करण्याची लाज वाटता कामा नये हे आम्ही प्रबोधिनीमध्ये शिकलो. विचार करताना मला वाटते ज्ञान प्रबोधिनीची सर्वात मोठी देणगी कुठली असेल तर the way we can connect to people is amazing !** मी कुठल्याही कंपनीच्या सुरक्षा रक्षकाशी किंवा चेअरमनशी तितक्याच सहजतेने बोलू शकतो आणि कनेक्ट होऊ शकतो ही गोष्ट मला नाही वाटत इतर कुठल्या शिक्षणपद्धतीमध्ये इतक्या सहज जमण्यासारखी आहे. आम्ही खरेच

भाग्यवान होतो की आम्ही अशा वातावरणात वाढलो. आम्हाला वेगवेगळी कार्य दिलेली असायची. मला आठवतंय, की मी आठवीमध्ये असताना पुण्यातल्या भाजी मंडईंचा सर्वे केला होता. हडपसर-मंडई अशा वेगवेगळ्या भागातील लोकांशी बोलून माहिती घेणे असे अनुभव शिक्षण इतरत्र मिळणे अवघड होते. आम्हाला ट्रेनी इंजीनीअर म्हणून काम केल्यावर confirmation असायची पण मला त्याची कधी चिंता नव्हती. मला लोकं सांगायची की तू तर आहेसच की इथे, तू कुठे जाणार आहेस? इतक्या सहजतेने ते काम झाले. दरम्यानच्या काळात आमचे काही मित्र MBAचा अभ्यास करत होती. माझ्याहून एक वर्ष लहान असणाऱ्या आनंद फाटकने MBAच्या प्रवेश परीक्षेचा फॉर्म भरला म्हणून मग मी पण भरायचे ठरवले. माझे पाहून आमच्याकडच्या २-३ ट्रेनी इंजीनीयर्सने देखील भरला. मी प्रबोधिनीचा असल्याने वाचनाची आवड तर होतीच. ज्याप्रमाणे मला मी प्रबोधिनीची परीक्षा कशी पास झालो हे आठवत नाही तसेच MBAची देखील परीक्षा कशी पास झालो हे आठवत नाही. गटचर्चेत तर काही प्रश्नच नव्हता. आत्ता जरी तुम्ही प्रश्न विचारला तर 'थांबा परांजपे' सांगायला लागेल इतके आपण बोलू शकतो. त्यामुळे मी तिथेही पास झालो आणि PUMBA मध्ये मला प्रवेश मिळाला. १९८६ साली मला प्रवेश मिळाला तेंव्हा मला इंजीनीअर होऊन बरोबर एक वर्ष झालेलं होतं आणि माझ्याकडे confirmation letter देखील हातात होतं. तेव्हा ते लेटर स्वीकारायचे की नाही हा विचार चालू असताना मी ठरवले की लेटर तर घेऊ आणि पुढचे पुढे पाहू! सहा महीने प्रोबेशनचे पूर्ण करायचेच असा करार ते लेटर घेताना होतो. त्यावेळी माझे MBAचे वर्ग सुरू झाले होते. मी सकाळी ७ ते ३:३० किर्लोस्करमध्ये काम करायचो आणि ३:३० नंतर विद्यापीठात जाऊन MBA करायचो. खडकीमधून विद्यापीठाकडे येणारा एक रस्ता आहे. माझ्या सुदैवाने त्यावेळेला MBAची वेगळी इमारत नव्हती आणि भा. द. खेर भवनात वर्ग चालायचे. त्यामुळे त्यांचा दिवसभर वर्ग चालू असल्याने आमचे वर्ग ३ ला सुरू व्हायचे. माझा एकच तास बुडायचा आणि मी ४ वाजता येऊन ८ वाजेपर्यंत वर्गात बसायचो. असे करत असताना लक्षात आले, की आपले सहा महीने झाले आहेत आणि दोन्ही गोष्टी सहज शक्य होत आहेत. १९८८ सालापर्यंत मी असेच सुरू ठेवले. व्यवस्थापनाचे महत्त्व मला त्यावेळेला किर्लोस्करमध्ये समजत होते. मी मेंटेनन्स डिपार्टमेंटमध्ये होतो आणि काहीतरी गोष्ट बंद पडली तरच आमची आठवण व्हायची. किती लवकर आम्ही बंद पडलेली गोष्ट सुरू करतो हा आमचा result area असायचा. या दरम्यान व्यवस्थापनाचे महत्त्व समजायला लागले आणि त्यातच पुढे काम करायचे असे ठरत गेले.

### रोज नवीन काहीतरी सुचलेच पाहिजे

१९८५ सालापासून गेल्या ३५ वर्षांच्या कामात मी कुतुहलाने सतत नवीन करून पाहत असे. खरं सांगायचं तर त्यामुळे मी कुठल्याच कंपनीमध्ये फार काळ टिकलो नाही. एक किर्लोस्कर कंपनीमध्ये ४-४.५ वर्षे टिकलो. MBA झाल्यावर माझ्या डोक्यात होते की आपण general management मध्ये जायचे म्हणून मी PPC म्हणून एका ठिकाणी दोन वर्षे जॉब केला. त्यानंतर स्वत:चा काही व्यवसाय केला पण त्यात अपयश आले. १९९७ साली एका छोट्या कंपनीत वर्क मॅनेजर म्हणून संधी मिळाली. साधारण २० जण तेथे कामाला होते. ज्ञान प्रबोधीनीचा कायम फायदा होत राहिला. लोकांशी कनेक्ट चांगला असल्याने मी तिथेही चांगले काम करू शकलो. १९९८ साली मला चांगली संधी मिळाली. Vossloh-Schwabe म्हणून एका जर्मन कंपनीला भारतात काम सुरू करायचे होते आणि संचालक सोडले तर मी त्यांचा पहिला कर्मचारी होतो. त्यावेळी फॅक्टरी उभी करण्याचा आणि ७-८ वर्षे चालवण्याचा चांगला अनुभव मला मिळाला. आम्ही त्यावेळी इलेक्ट्रिकल प्रॉडक्ट बनवायचो आणि आमची कामगिरी बरीच चांगली राहिली असे मी म्हणेन. दरम्यानच्या काळात मी KAIZEN म्हणजे Continuous improvement आणि lean manufacturing ह्या तंत्राबद्दल परिचित झालो. विनोद ग्रोवर, ज्यांना मी गुरू मानतो ते KAIZEN Institute India चे नेतृत्व करत होते. मसाकी इमाई यांनी या तंत्राला प्रसिद्ध केले. त्यांच्यासोबत मी Lean Manufacturing आणि KAIZEN चे प्रयोग करायला सुरुवात केली. त्यातील काही प्रयोग मी माझ्या Vossloh-Schwabe कंपनीमध्येच केले आणि मला चांगले अनुभव आले. कुठलीही नवीन गुंतवणूक न करता एखाद्या कंपनीची क्षमता दोन मिलियन टनावरून तीन मिलियन टनावर आपण नेऊ शकतो हे माझ्या तिथे लक्षात आले. आमचा गट चांगला होता आणि कनेक्ट चांगला असल्याने एकत्र काम करण्यात फारसे प्रश्न येत नाहीत. हा जॉब मी आठ वर्षे केला तो माझा सगळ्यात जास्त चाललेला जॉब होता.



**श्री. मसाकी इमाई यांच्या बरोबर**

**नाशिकमध्ये जी.एम. मॅन्युफॅक्चरिंगमध्ये मी जॉबला असताना माझ्या हाताखाली जवळ-जवळ हजार लोक काम करत होते. आम्ही तिथे CFL दिवे बनवत असू. त्याची क्षमता आम्ही एका वर्षात दर दिवशी ५००० दिव्यांपासून दर दिवशी १५००० दिव्यांपर्यंत वाढवली. एशियन इलेक्ट्रॉनिक्सने MSEB सोबत मोफत CFL दिवे वाटण्यासाठी एकत्रित काम करण्याचे ठरवले होते आणि लोकांची जशी ऊर्जेची बचत होईल तसे पैसे परत करायचे असे ठरले होते. आमच्या कार्यकाळात ते एक चांगले साध्य होते असे मी म्हणेन. कुतुहल स्वस्थ बसू देत नाही म्हणून ERP काय आहे हे जाणून घ्यायला KPIT-Cummins मध्ये मी ERP Consultant म्हणून काम केले. ह्या सगळ्या गोष्टींसाठी असे काही निश्चित कारण नव्हते. 'करून पहायचे' म्हणून मी ही अनुभव घेत गेलो. अशा सगळ्या अनुभावातून २००८ साली KAIZEN Institute मध्ये मी जॉइन झालो. त्यामध्ये आमच्या २५ जणांच्या गटानी भारत, आफ्रिका आणि मध्य आशिया अशा तीन प्रांतात काम होते. आफ्रिकेमध्ये झांबिया, केनिया, इथियोपिया, टांझानिया, दक्षिण आफ्रिका अशा अनेक देशांमध्ये मी काम केले. भारतामध्ये अनेक कंपन्यांबरोबर काम करायची संधी मिळाली. जवळ-जवळ आठ वर्षांत ५० ते ५५ कंपन्या आणि संस्थांबरोबर मी खूप जवळून आणि प्रत्यक्ष कंपन्यांमध्ये जाऊन चांगले काम करू शकलो. ह्या सगळ्याचा key-word आहे तो म्हणजे Productivity Improvement किंवा Continuous Improvement in productivity. त्यामध्ये 5S, JIT, KANBAN अशी काही तंत्र आहेत. ह्याच दरम्यान मी USA Body तर्फे Bronze Lean Consultant असे सर्टिफिकेट प्राप्त केले. मी प्रोफेशनली Lean Consultant आहे आणि त्याचे दोन सर्टिफिकेशन MSME मंत्रालयानी केलेली आहेत. हे काम माझे सतत सुरू असते. या दरम्यान खूप प्रवास करायला मिळाला. लोकांशी बोलण्याची आवड असल्याने हे सर्व काम करणे अवघड न जाता त्यात मजा आली!**



## नेतृत्व आणि KAIZEN

नेतृत्व हा शब्द मला खूप मोठा आणि अवघड वाटतो. नेतृत्व शब्दापेक्षा नेता हा शब्द मला सोपा वाटतो. इतक्या वर्षांत काम करत असताना नेता म्हणून मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की लोक कायम तुमच्याकडे पाहत असतात आणि तुमच्याकडे पाहून शिकत असतात. तुम्ही प्रत्यक्ष सांगितले नाही तरी तुमच्या भावना समोरच्याला कळत असल्याने आघाडीवर राहून नेतृत्व करणे हे महत्त्वाचे असते. तुम्ही नेता म्हणून जे बोलता ते करून दाखवायला हवे! मी एक काहीतरी सांगतो आहे आणि काम दुसरेच करतो आहे असे झाले तर लोक ते समजू शकत नाहीत. **मी आत्तापर्यंत ज्या-ज्या ठिकाणी नेतृत्व केले तिथे यशस्वी झालो आहे असे मी म्हणू शकेल. Asian Electronics मध्ये काम करत असताना आम्ही ५००० दिवे बनवण्याच्या वेग एका वर्षात १५००० पर्यंत यशस्वी रीतीने वाढवला. त्यासाठी आम्ही बाहेरून लोक बोलावले नाहीत तर आम्ही ते आमच्याच माणसांच्या कडून यशस्वी करून घेतले. लोक इतक्या ताकदीने तेव्हाच काम करू शकतात जेव्हा त्यांच्यासमोर कार्यमग्न आणि बोललेले काम तडीस नेणारा नेता असतो. असे अनेक अनुभव आले आणि विशेषत: KAIZEN तंत्र हे Participative तंत्र आहे. 'मी सांगतो आणि तू कर' असे यात नाही. आम्ही लोकांना सांगतो की ज्या क्षणाला तुम्ही इतरांना काय करा असे सांगणे बंद करता त्या क्षणाला खरा विकास सुरू होतो. KAIZEN मध्ये आम्ही नेहमी सांगतो, की आपण लोकांचा फक्त डोक्याच्या खालचा भाग कामावर ठेवलेला नाही, त्यामुळे त्यांच्याकडून उपाय आणि कल्पना येऊ देत. अशाच सुधारणा टिकतात आणि यशस्वी होतात ज्या प्रत्यक्ष कर्मचारी वर्गाकडून आलेल्या असतात. ज्या वेळेला मॅनेजर सांगतो की तू ही वस्तू अशी ठेवली आहे तर ती आता तशी ठेव तेव्हा तो कर्मचारी ती सुधारणा विफल कशी होईल असाच विचार करत राहतो. पण तीच सुधारणा जर कर्मचारी वर्गाकडून आलेली असेल तर ते ती आयुष्यभर पाळतात.** त्यामुळे नेतृत्व म्हणजे कधी बोलायचे असते तर कधी न बोलता करायचे असते. एकदा अकबर सामान्य लोकांत जाऊन साधे कपडे घालून लपून बसतो आणि बिरबल क्षणात येऊन त्याला 'सलाम खाविन्द' म्हणतो.



त्या गोष्टीमध्ये सगळ्या लोकांचे डोळे अकबराकडे असतात तसे नेत्याकडे सगळ्यांचे डोळे असतात असे मी अनुभवाने सांगू शकतो आणि लोकांना मी हे जाणीवपूर्वक अनुभवायला देखील सांगत असतो.




मला असे वाटते की कुठला मोठा पराक्रम आजपर्यंत केला नाही मात्र उपयुक्त गोष्टी मी खूप केल्या. समाजाला मदत होईल आणि उपयुक्त ठरतील अशा अनेक गोष्टी मी केल्या आणि आजही करत आहे. **To the society at large या उद्देशाने मी आजही काम करत आहे. Productivity improvemenent आणि we being Competetive हे जास्त चांगले उद्दीष्ट आहे असे मला वाटते. त्यामध्ये खूप मोठा पराक्रम करतोय असे मला त्यामुळे वाटत नाही. कंपनीची उत्पादन क्षमता वाढवणे, स्पर्धात्मकता वाढवणे आणि त्यातून समाजाचा फायदा होईल असे काम मी उत्तमतेने करू शकतो. त्यादृष्टीने L to E म्हणजे Lean to Excel Firm द्वारे मी काम करतो आहे. तिथे व्यवस्थापन आणि कंपनी नियोजनात त्या-त्या क्षेत्रात उंची गाठलेले आम्ही २०-२५ जण एकत्र येऊन समाजाचे देणे समाजाला परत द्यायचा विचार करत आहोत. आत्मनिर्भर योजनेतील आमचा खारीचा वाटा उचलत आहोत! मला या क्षेत्रता लौकिक अर्थाने अजून काही साध्य करायचे असे वाटत नाही. वेगळी क्षेत्र मी आता धुंडाळत आहे. माझी इलेक्ट्रिकलची पार्श्वभूमी असल्यामुळे २०१७ साली मी सोलर रुफटॉपचा व्यवसाय सुरू केला. आजपर्यंत गेल्या ३-४ वर्षांत २५० ते ३०० किलो वॅटची पन्नासहून जास्त इन्स्टॉलेशन मी आत्तापर्यंत केली आहेत. आपल्या प्रबोधिनीचा वरचा सोलार प्रकल्प मीच केला आहे. निगडीमध्ये दोन प्रकल्प केले आहेत. हे समाजासाठी मोठ्या पातळीवर नक्की उपयुक्त आहे. प्रबोधिनीने आपल्याला हे नक्की शिकवले आहे की काहीतरी उपयुक्त काम आपल्या हातून घडावे यासाठी झटत राहणे. मी सोलारचे कामदेखील सुरूच ठेवणार आहे आणि सोबत सल्लागार म्हणून पण काम सुरू ठेवणार आहे.**

पुरस्कारांमध्ये मला असं फार मोठं विशेष किंवा त्याचं फार कौतुक नाही वाटतं. या सगळ्याकडे फक्त दखल घेण्यासाठी किंवा उत्तेजनासाठी म्हणून मी पाहतो. मला जास्त आनंद समाजाला माझे काम उपयोगी पडते तेव्हा होतो. परवाच मला कोल्हापूरहून एकाचा फोन आला होता, सर तुम्ही सांगितल्या प्रमाणे आम्ही फॅक्टरी उभी केली आहे आणि तुम्ही ती एकदा नक्की बघायला या. आत्ता करोनाच्या काळात कोणीतरी Lean तंत्र वापरून फॅक्टरी सुरू करतोय याचा आनंद मला कुठल्याही पुरस्कारापेक्षा जास्त आहे. सोलरमुळे कमी झालेली वीज बिले बघून देखील मला समाधान मिळत राहते. असे उपयुक्त काम मला जास्त महत्त्वाचे वाटते.



**उद्योगरत्न पुरस्कार**

भारतीय समाजाची प्रगल्भता माझ्या दृष्टीने प्रचंड आहे. ज्ञान प्रबोधिनीचा एक drawback म्हणजे आपण समजापासून थोडेसे तुटक राहतो. मला असं खूप वेळेला वाटतं की we were pampered. आम्हाला खूप आंजारून-गोंजारून वाढवले. 'रूप पालटू देशाचे' हा उदात्त विचार नक्की दिला पण त्याचवेळी समाजापासून नक्कीच आपण अंतरावर होतो. सामान्य जनता आपल्यापेक्षा खूप प्रगल्भ आहे. आत्ता लॉकडाऊनमध्ये धंदा बंद पडल्याने ज्या लोकांना भाजी विकायला लागते आहे अशा लोकांशी आपला किती कनेक्ट आहे? आपण आपल्या चष्म्यातून समाजाकडे बघतो हा drawback आहे असे माझे वैयक्तिक मत आहे. आपले अनेक उपक्रम सुरू असतात पण आपण अजून पूर्णपणे त्या भिंती नाही तोडू शकलेलो. **निगडी प्रबोधिनीमध्ये मी कामाच्या निमित्ताने कायम जात असतो. ते पाहून मला असे कायम वाटते की पुणे प्रशालेपेक्षा निगडी प्रशालेचा प्रयोग हा जास्त सुसंगत आहे. उद्दीष्ट निश्चित वेगळी आहेत. मात्र Society at large म्हणून पाहताना ज्ञान प्रबोधिनी, निगडी हा खूप चांगला आणि यशस्वी प्रयोग वाटतो आणि त्यादृष्टीने मनोज देवळेकरांशी बोलून त्यात अधिक काम करायला देखील मला आवडेल. निगडी प्रशालेत येणारा मुलगा हा परीक्षा घेऊन निवडलेला नसल्याने, बुध्यांक पाहून घेतलेला नसतो. मला कधीच असं वाटलं नाही की ज्ञान प्रबोधिनीमधील सर्वच मुले यशस्वी होतात यात काही कौतुक आहे. जर तुम्ही समाजातील १४०+ IQ ची मुले बाजूला काढणार असाल तर ती यशस्वी झालीच पाहिजेत! फरक कुठे आहे तर तुम्ही त्यांना विचारांची दिशा देऊ शकता आणि समजाचा विचार करण्याची दृष्टी देऊ शकता आणि त्याचा फायदा देखील खूप आहे.** पण असा सर्व विचार करता ज्ञान प्रबोधिनी, निगडी हा मला व्यक्तिश: खूप सुसंगत आणि आश्वासक प्रयोग वाटत आहे. त्यांचे माजी विद्यार्थी

आणि पालकांची संघटना पाहिली आणि त्याचे उपक्रम पाहिले तर निगडी मधील सर्वात मोठ्या संघटनांपैकी ते एक आहेत. असे शंभर-हजार करत अधिकाधिक प्रयोग कसे करता येतील याचा विचार केला पाहिजे आणि त्यासाठी काम करायला मला नक्की आवडेल. पुणे प्रशालेमध्ये तंत्रज्ञान विशेष उद्दीष्ट गटात मी काही काम करत आहे. त्यामध्ये आम्ही सात-आठ उद्दिष्टांवर काम करत आहोत आणि ती आम्ही विभागून घेतली आहेत. त्यामध्ये पाण्याची उपलब्धता याविषयी मी अभ्यास करत आहे. त्यात atmospheric water generation अशी संकल्पना निवडून काम करायचे मी ठरवत आहे. हवेतील बाष्पाचे पाण्यात रूपांतर करायचे. त्या संदर्भात काही वाचन आणि इस्त्राईलच्या कंपन्यांसोबत माझे बोलणे सुरू आहे. विशेष उद्दीष्ट गटांच्या माध्यमातून पाण्याची उपलब्धता या विषयी काम करणायचे सुरू आहे.

**माणसाचे शिक्षण फक्त पुस्तकातून होते असे नाही तर समोरच्याच्या वागण्या-बोलण्यातून तो अधिक शिकत असतो. प्रत्येकाच्या वागण्या बोलण्यातूनही बरच काही शिकायला मिळालं. मला एक छोटी आठवण फार प्रकर्षाने जाणवते. आप्पांच्या शेवटच्या काही दिवसांत गिरीशराव कॅनडाहून डॉक्टरेट करून परत आले होते. आमच्या दृष्टीने चार वर्ष परदेशात राहून, डॉक्टरेट केलेला मनुष्य आणि पहिल्याच दिवशी त्यांनी आमच्या सोबत उपासना मंदिरात सतरंज्या गुंडाळल्या. हे कल्पने पलीकडले वाटते, पण ज्ञान प्रबोधिनीमध्ये हे शक्य आहे. हे शिक्षण आणि हा प्रसंग आठवल्यावर मी ही शिकवण आयुष्यभर विसरूच शकत नाही. अशा अनेक गोष्टी प्रत्यक्ष पाहत आम्ही शिकत गेलो. ज्ञान प्रबोधिनीमुळे अशा अनेक गुरुतुल्य व्यक्ती वेळोवेळी भेटल्या. मोहनरावांचे प्लॅनिंग तुम्ही पाहा. आजसुद्धा कुठले नवीन प्रॉडक्ट सादर करायचे असले तर मोहनरावांचा एकदा सल्ला घेऊन पहा. अतिशय सुंदर आणि आखीव-रेखीव अक्षर आणि एकही गोष्ट सुटून जाणार नाही असे प्लॅन ए, प्लॅन बी, प्लॅन सी अशा गोष्टी त्यात असतील. विकुसरांचा दांडगा अभ्यास हे पाहत मी शिकत गेलो. व्यावसायिक क्षेत्रात देखील प्रत्येक कंपनीमध्ये अनेक मार्गदर्शक, अधिमित्र आणि नेता म्हणता येईल अशी माणसं भेटली. ही सगळी लोकं आपल्याला काय करायचे आहे आणि त्यासाठी काय करायला लागेल याचे आडाखे मनात स्पष्ट ठेवून वाटचाल करणारी असतात. त्याप्रमाणे आपल्याला वर्तवणूक करावीशी वाटते. विनोद ग्रोव्हर, रामस्वामी, जयंत मूर्ती अशा जवळपास सगळ्यांकडूनच मी शिकायचा प्रयत्न करत असतो.**




माझी कार्यदिशा आता बऱ्यापैकी ठरलेली आहे. जास्तीत-जास्त लोकांना फायदा होऊ शकेल ह्यादृष्टीने मी कन्सल्टिंग सुरूच ठेवणार आहे. सोलर रुफटॉपच्या कामाला चांगले दिवस आहेत ते ही मी सुरू ठेवेन. विशेष उद्दिष्ट गटाचे कामही सुरू आहे. आता मी मोकळा विचार करू शकतो, एखाद्या चांगल्या गोष्टीसाठी मी वेळ देऊ शकतो आणि त्यावर काम करू शकतो. आयुष्यात हे मिळवायचे बाकी आहे किंवा हे साध्य करायचे बाकी राहिले असे काहीच नाही. माझा जास्तीत- जास्त उपयोग लोकांना व्हावा यासाठी पुढेही काम करायला आवडेल. मला लोकांना भेटायला आणि त्यांच्याशी संवाद करायला खूप आवडतो! मी रोटरी क्लबचा देखील सदस्य आहे आणि तिथे सुद्धा भन्नाट लोकं मला भेटत असतात. रोटरी क्लबमध्ये आमचे जवळपास ७०-८० दिग्गज लोक आहेत. त्यामुळे एक नक्की की शेवटपर्यंत मी माणसांत मिसळत राहीन.


माझा भरपूर प्रवास भारतात आणि भारताबाहेरही झाला आहे. आफ्रिकेत मी काही वर्षं काम केले होते, मोठ्या शहरात केले तसेच लहान गावांमध्येही काम केले. आजपर्यन्त केलेले प्रवास आणि विविध दौरे यातून मी काय शिकलो असेल तर Empathy हा एक शब्द फार महत्त्वाचा आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आपुलकीने, सहानुभूतीने आणि त्यांचा ते जसे आहेत तसा आदर ठेवून आपण त्यांना जवळ केले पाहिजे. तुम्ही लोकांचा आदर केलात तरच ते तुमचा आदर करतात असा माझा अनुभव आहे. कोणतीही व्यक्ती ही मुळातच वाईट किंवा दोषी नसते तर वाईट असते ती परिस्थिती! आफ्रीकेमध्ये मी अनेक देश फिरलो आणि तिथे एक गोष्ट खूप विचित्र आहे पण ती मान्य करायला लागते. तिथे इतकी गरीबी आहे की जवळपास प्रत्येक लहान मूल हे गरिबीपोटी किंवा भुकेपोटी नैसर्गिकपणे चोरी करायला लागते. हे वैचारिकदृष्ट्या पचवायला जड जाईल आणि हे पटवून घ्यायला कदाचित वर्षं जातील. पण त्याचवेळी आपण विचार केला पाहिजे. Empathetic विचार करायला बहुदा केसच पांढरे व्हायला लागतात. अजूनही मी अनेकदा चिडतो, लोकांवर ओरडतो किंबहुना अनेकदा मनात नसतानाही ओरडतो. पण त्याच वेळी हे समजून घ्यायला लागते, की समोरच्या व्यक्तीच्या अनेक गोष्टी आपल्याला माहीत नाहीत की ज्यामुळे तो असा वागत आहे. आफ्रिकेमध्ये गरिबी आहे म्हणून ते मूल दोशी आहे असा त्याचा अर्थ आपण

लावायचा का? आपण जेवढे देऊ तेव्हढेच किंबहुना त्याहून अधिकच आपल्याला समाजाकडून परत मिळत असते. त्यामुळे जिवाभावाने आणि आपुलकीने सर्वांशी वागावे हा मला सापडलेला आणि मी अनुभवलेला मूलमंत्र आहे.

**प्रबोधिनीच्या शिक्षणाचा फायदा खूप झाला. आधी सांगितल्याप्रमाणे लोकांशी संवाद कसा करायचा, मोठे ध्येय ठेवायचे, समाजासाठी उपयुक्त असे काम करायचे, नैसर्गिक रीतीने नेतृत्व कसे करायचे असे आम्ही शिकलो. एक तोटा जो मला जाणवला तो म्हणजे आत्मविश्वास आणि अतिआत्मविश्वास याच्यामध्ये एक पुसटशी रेषा असते. मला जो आत्मविश्वास वाटतो तो इतर लोकांना अतिआत्मविश्वास वाटतो. असे माझ्याबाबतीत अनेकदा झालेलं आहे आणि त्यामुळे मी काही त्रास देखील उपभोगला आहे. प्रबोधीनीची लोकं शिष्ट असतात असे समाज म्हणतो आणि हे पूर्णपणे चुकीचे नाही. गेले ३२ वर्षं मी हे ऐकतोय आणि ते मान्य करायला हवे की हा शिष्टपणा शक्य तितका काढून टाकायला पाहिजे. आपल्याला जे काय साध्य करायचे आहे ते Society at large आहे आणि ते एखाद्या बंदिस्त खोलीत बसून नाही करता येणार.**

इतके वर्षं प्रबोधिनीच्या संपर्कात राहायचे कारण हे अगदी सरळसोपे आहे. मला प्रबोधिनीत आल्यावर आपलेपणा वाटतो. मी कधीही प्रबोधिनीत येऊन कुणाशीही दोन-पाच मिनिटे बोलू शकतो. प्रबोधिनीत आल्यावर मनाला शांती मिळते. मला प्रबोधिनीचे उद्दीष्ट आणि विचारही पटतात व त्यासोबत मी चांगल्या पद्धतीने बांधील आहे हे देखील त्यामागचे कारण असू शकेल. माझी इच्छा आहे, की मी जरी म्हटलो की निगडी प्रशाला अधिक सुसंगत वाटते तरी ज्ञान प्रबोधिनी प्रशाला हा एक अभिनव आणि महत्त्वाचा प्रयोग आहेच! अजून खूप वर्षं हा वारसा चालूच राहायला पाहिजे असे नक्की वाटते. कारण आप्पांची जी मूळ कल्पना होती, की प्रशालेतून उत्तम मानसिकतेचे नेतृत्व जन्माला येईल हा विचार वाढला पाहिजे आणि फुलला पाहिजे! त्यावर दुमत नक्कीच नाही. कुठल्याही काळात नेते लागणार आहेतच आणि असे नेते घडवता येतात हा जो प्रयोग आहे तो नक्कीच चालू राहायला पाहिजे. नवीन उमद्या प्रबोधकांना मला सांगायला आवडेल की तुम्ही भाग्यवान आहात तर भरपूर संधी घ्या, विविध क्षेत्रात काम करून बघा, अनुभव शिक्षण सोडू नका! आपण खूप नशीबवान आहोत, की आपल्याला हवे ते मिळते आहे, ज्यासाठी बाहेर इतरांना संघर्ष करायला लागतो त्या गोष्टी तुम्हाला मिळत आहेत. प्रबोधिनीने एक प्रकारे आपल्याला अधिकार दिला आहे तर त्याबरोबर येणारी जबाबदारी देखील घ्यायला आपण शिकलो पाहिजे असे मला वाटते!





## Rapid Fire

१. आवडता चित्रपट – शोले
२. आवडते पुस्तक – Abundance
३. आवडता 'मॅनेजमेंट गुरू' – मसाकी इमाई
४. तुमचा छंद/ आवड – सगळे खेळ पाहायाला आवडतात. मी सायकलिंग किंवा गोल्फसुद्धा लाईव्ह पाहू शकतो इतकी आवड आहे. वाचनाची मला प्रबोधिनीने लावलेली चांगली आवड आजही आहे.
५. पहिली प्रतिक्रिया

- संघटना – राष्ट्रीय स्वंयसेवक संघ
- उद्योग – मला रिलायन्सचे गेल्या १० वर्षातील कार्य कौतुकास्पद वाटते. वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांची वाढ वाखणण्याजोगी आहे.
- आप्पा पेंडसे – ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व
- KAIZEN - It's my passion!
- व्यवस्थापन – Walk the talk
- ज्ञान प्रबोधिनी – माझ्या हृदयाची स्पंदने! It's like my heartbeat!

६. जर पुन्हा नव्याने आयुष्य जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल/कोणत्या क्षेत्रात काम करायला आवडेल? (आत्ताच्या क्षेत्रा व्यतिरिक्त)

– मला नाही वाटत मला अजून काही वेगळं करायला आवडेल किंवा जमेल सुद्धा. मला पुन्हा हेच आयुष्य, हाच व्यक्ती म्हणून जगायला आवडेल!

**प्रदीप परांजपे**
9096645201, 9881717344
pvparanjape@gmail.com

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org